PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 4, ISSUE 1

# आधुनिक काळातील नोकरशाहीची भूमिका

**डॉ. भारत गोरे**
सहायक प्राध्यापक व प्रमुख,
लोकप्रशासन विभाग,
विवेकानंद महाविद्यालय, औरंगाबाद
**महाराष्ट्र भारत**

## प्रास्ताविक

संघटना, विशेषतः शासकीय संघटना आणि त्यात कार्यरत असणारी नोकरशाही ही लोकप्रशासनाच्या अभ्यासाचा केंद्रबिंदू आहे. ही नोकरशाही शासनाचे एक महत्वपूर्ण व अविभाज्य अंग आहे कारण याच माध्यमातून शासन आपल्या ध्येयधोरण व निर्णयांची अंमलबजावणी करत असते. आज सर्वत्र, मग ते सार्वजनिक क्षेत्र असो की खाजगी, लहान संघटन असो वा मोठे, विकसित देशातील असो वा विकसनशील, नोकरशाही व्याप्त आहे. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तीगत, सामाजिक, राजकीय, आर्थिक, संघटनात्मक जीवनावर या नोकरशाहीचा प्रभाव पडला आहे.

**नोकरशाहीचा अर्थ व स्वरूप :**

नोकरशाही ही व्यापक व अपरिहार्य आहे. हांस रोजनबर्ग (Hans Rosenberg) म्हणतो त्याप्रमाणे- “ही व्यवस्था चांगली आहे की वाईट परंतु शासनाच्या वर्तमान संरचनेचा ती एक अनिवार्य भाग आहे. ही व्यावसायिक प्रशासनाची पसरलेली अशी व्यवस्था आहे, ज्यामध्ये नियुक्त पदाधिकारी पदसोपान रचनेचा भाग आहेत व ज्यांच्यावर सबंध समाज पूर्णतः विसंबून आहे. आपण तीव्र स्वरुपाच्या सर्वसत्ताकेंद्री हुकूमशाहीमध्ये रहात असू की सर्वथा उदारमतवादी

लोकशाहीमध्ये रहात असू परंतु मोठ्या प्रमाणात आम्ही कोणत्या ना कोणत्या प्रकारे नोकरशाहीकडूनच शासित होत असतो.''

फ्रेंच भाषेतील 'ब्युरो' (Bureau) या शब्दापासून इंग्रजीतील 'ब्युरोक्रसी' (Bureaucracy) अधिकारीतंत्र/नोकरशाही हा शब्द तयार झालेला आहे. ब्युरोचा शब्दशः अर्थ 'लिहिण्याचा टेबल' असा होतो. म्हणजे डेस्क किंवा टेबलवरील सरकार असेही याला म्हणता येते. हुकूमशाहीमध्ये ज्याप्रमाणे हुकूमशहा केंद्रबिंदू असतो, लोकशाहीमध्ये लोक तसे नोकरशाहीमध्ये हे शासकीय नोकर किंवा अधिकारी महत्वाचे असतात. त्यामुळे अधिकाऱ्यांमार्फत व अधिकाऱ्यांसाठी चालणारे शासन म्हणजे नोकरशाही शासन असा एक अर्थ लावता येतो. फ्रेंच विचारवंत विन्सेंट डी. गोर्ने (Vincent D. Gourney) यांनी या शब्दाचा वापर सर्वप्रथम १७४५ साली फ्रांसमधील तत्कालीन अनागोंदी, अव्यवस्था अनुभवतांना एक आजार म्हणून (ब्युरोमेनिया) नकारात्मक अर्थाने केला होता. शासकीय अधिकाऱ्यांचा स्वैराचार, अनुत्तरदायित्व, अपव्यय, हस्तक्षेप, अकार्यक्षमता, सत्तेचा दुरुपयोग, उदासीनता, अहंभाव या काहीशा अवमानजनक, सदोष अर्थांनीच नोकरशाही शब्दाचा वापर अधिक झाला. इतःपर नोकरशाहीतील अधिकारी व्यक्तीला अनुभवी, ज्ञानी किंवा जबाबदार या अर्थांनीही पाहिले जाते.

मायकल क्रोजियर नावाचा विचारवंत म्हणतो की, नोकरशाही हा एक अस्पष्ट शब्द आहे. सामाजिक शास्त्रांमध्ये हा शब्द मुख्यतः तीन अर्थांनी वापरला गेला आहे. 1) पहिल्या अर्थानुसार ब्युरोक्रसी म्हणजे ब्युरो सरकार होय. हे राज्याच्या त्या विभागांद्वारे संचलित होतात जेथे निर्वाचित नाही तर नियुक्त कार्यकर्ता असतात. हे पदसोपान तत्वाने संघटित असतात शिवाय कायदा व सुव्यवस्थेच्या शासनाचे रुप असतात. परंतु यामध्ये जनतेचे योगदान शुन्य असते. 2) नोकरशाहीचा दुसरा अर्थ मॅक्स वेबरपासून सुरु झाला. याला समाजशास्त्रज्ञ आणि इतिहासकारांनी लोकप्रिय केले. यांच्या मते, सामुहिक क्रियांचे विवेकीकरण (Rationalization of Collective Activities) नोकरशाही आहे. यामध्ये अवैयक्तिक नियमांचा विकास करण्यात आलेला असतो आणि त्यानुसारच विविध पदाधिकाऱ्यांच्या अधिकार व जबाबदाऱ्या स्पष्ट केल्या जातात.

3) नोकरशाहीच्या तिसऱ्या अर्थानुसार ते अशी संघटना आहे जेथे कार्यांना गती नसते, प्रक्रियेत गुंतागुंत असते, नियमित कार्यपद्धती, लालफित, संकुचित विचार इत्यादी गोष्टी एकत्र असतात.

एफ. एम. मार्क्स नोकरशाही या शब्दाचे चार अर्थ सांगतो. यामध्ये 1) लोकप्रशासनाच्या संचालनासाठी एक सर्वसाधारण रुपरेखा किंवा एक विशिष्ट प्रकारचे संघटन नोकरशाही आहे. 2) संघटनेच्या चांगल्या व्यवस्थापनामध्ये एक बाधक आजार म्हणून नोकरशाही आहे. यात एक प्रकारची यांत्रिकता, कठोरपणा, औपचारिकता इ. आहे. 3) नोकरशाहीचा अर्थ 'मोठे शासन' आहे. जेथे मोठया आकाराचे व विस्तृत कार्यक्षेत्राचे उपक्रम आहेत, तेथे नोकरशाही अवश्य असते. शासनाच्या मोठया कारभाराला संचलित करण्यासाठी मोठे यंत्र नोकरशाही आहे. सहाजिकच आधुनिक कल्याणकारी राज्यात शासनाच्या कार्यकारी मंडळ व प्रशासकीय शाखेला मोठे महत्व येते व त्याला 'प्रशासकीय राज्य' म्हणता येवू शकते. 4) नागरी स्वातंत्र्याला संकटात पाडणारा व त्याला अपंग करणारा रोग नोकरशाही आहे कारण हे असे शासन असते ज्यामध्ये सर्व नियंत्रण अधिकाऱ्यांच्या हाती असते आणि त्यांचा उद्देश स्वहित असतो.

हेरॉल्ड लास्की म्हणतात, नोकरशाही म्हणजे शासनाची एक अशी व्यवस्था ज्यामध्ये नियंत्रण हे पूर्णतः अधिकाऱ्यांच्या हातात असते आणि त्यांच्या या सत्तेमुळे सामान्य नागरिकांचे स्वातंत्र्य धोक्यात येते.

जे. एस. मिल नोकरशाहीला समाजातील शासनाचा व्यावसायिक प्रशासक वर्ग म्हणून पाहतो. हरमन फायनर हे देखील नोकरशाहीला 'शासकीय अधिकाऱ्यांचे शासन' मानतो. लास्वेल व कप्लान नोकरशाहीला असे प्रशासन मानतात ज्यामध्ये उच्चवर्णीय लोक अधिकारपदावर विराजमान होतात. मिचेल्स या विचारकाने नोकरशाहीला व्यापक दृष्टिकोनातून पाहिले आणि त्यात शासकीय किंवा राजकीय पक्षांसारख्या अशासकीय संस्थांमध्ये कार्यरत वेतन घेणारे व्यावसायिक पदाधिकारी अंतर्भूत केले. रॅम्जे म्यूरच्या मते, नोकरशाही म्हणजे स्थायी अधिकारी व व्यावसायिक प्रशासक. ला पालोम्बराच्या मते, नोकरशाहीच्या अंतर्गत सर्वच लोकसेवक येतात.

टेलकॉट पार्सन हा विचारवंत नोकरशाहीला संघटनेचा पर्यायवाची मानतो. जर्मन शब्दकोशानुसार नोकरशाही ही अशी सत्ता किंवा शक्ती आहे ज्याचा वापर शासनातील विविध विभाग व त्यांच्या शाखांकडून नागरिकांवर केला जातो. बेंट अब्राहमसन म्हणतात की, नोकरशाही संकल्पना अनेकार्थी आहे. विशेष प्रशासकीय कार्य करणाऱ्या व्यक्तींची श्रेणी स्पष्ट करण्यासाठी, संघटनेच्या एका विशिष्ट रुपासाठी आणि अवमानास्पद तसेच विवादास्पद दृष्टीने आधुनिक समाजातील काही विशिष्ट प्रवृत्तींच्या टीकेसाठी संक्षिप्त शब्दावली म्हणून याचा वापर केला जातो. त्याचबरोबर पीटर ब्लाऊ म्हणतो की, नोकरशाही असे संघटन आहे जे प्रशासनामध्ये अधिक कार्यक्षमता आणते.

एक फार मोठा कालखंड नोकरशाहीच्या संबंधाने नकारात्मक स्वरुपात आकलन करण्यात आले होते. मात्र आधुनिक नोकरशाही संकल्पना ही मुख्यतः संरचनात्मक व कार्यात्मक (Structural, Functional) दृष्टिकोनातून स्पष्ट करण्यात येत आहे. मॅक्स वेबर यांनी नोकरशाहीला सर्वव्यापी सामाजिक घटना मानले. त्यांनी नोकरशाहीचे आदर्श प्रारुप (Ideal Model) प्रतिपादित केले ज्यामध्ये नोकरशाहीची वैशिष्ट्ये संरचनात्मक, कार्यात्मक व व्यावहारिक स्वरुपात स्पष्ट करण्यात आली होती. नोकरशाही या शब्दाला त्यांनी अधिकाऱ्यांचे अमर्याद शासन या नकारात्मक अर्थाने न घेता एक विशिष्ट व अपरिहार्य प्रशासकीय संघटन या स्वरुपात घेतले.

मार्शल डिमॉक या विचारकाने नोकरशाहीची ओळख समाजातील मोठया संघटना व संस्थात्मकतेतून केली. नोकरशाहीला तो समाजविकासाची ती अवस्था मानतो ज्यामध्ये श्रमविभाजन, विशेषीकरण, संघटन, पदसोपान, नियोजन या माध्यमातून व्यक्तीच्या मोठया समुहावर, ऐच्छिक अथवा अनैच्छिक पद्धतीद्वारे कठोर नियंत्रणाची व्यवस्था करण्यात येते.

जॉन व्हेग नोकरशाहीला डेस्क शासन किंवा ब्युरोच्या माध्यमातून व्यवस्थापन म्हणजे नोकरशाही मानतात. याचा अर्थ स्पष्ट करतांना ते म्हणतात की, कर्मचारी, यंत्रे व कार्यपद्धतींचे असे एकत्रिकरण ज्याद्वारे एखादी संघटना आपल्या उद्दिष्टांची पूर्तता करत असते. हे संघटन

सार्वजनिक असू शकते अथवा खाजगी, शासकीय, व्यापारी, शैक्षणिक अथवा चर्चविषयकही असू शकते. याचा जर आकार मोठा असेल तर अनिवार्यतः ती नोकरशाही असेल.

प्रा. चार्ल्स हायनीमन नोकरशाहीला एक मोठी संघटना मानतात. जर एखाद्या संघटनेत धोरण निर्मिती कोण करत आहे याचा शोध घ्यावा लागत असेल किंवा तेथील धोरणे अथवा कार्यपद्धती लिखित स्वरुपात असेल, संघटनेतील एका विभागाला संघटनेतील दुसरा विभाग काय करणार आहे हे जाणून घेण्यासाठी ठराविक वेळ लागणार असेल तर अशी मोठी संघटना नोकरशाही संघटना आहे.

पीटर ब्लाऊ व मार्शल मेयर या विचारवंतांनीही नोकरशाहीला परिभाषित करतांना त्याच्या संस्थात्मक व कार्यात्मक पक्षावरच अधिक भर दिला. ते म्हणतात, नोकरशाही अशी संघटना आहे ज्यामध्ये अनेकानेक व्यक्तींच्या कार्यात व्यवस्थित समन्वय निर्माण करण्यात येवून मोठया प्रमाणात प्रशासकीय कार्ये पूर्ण केली जातात. ऑर्थर डेव्हीस हे अभ्यासक देखील नोकरशाहीला संघटनेच्या रुपात संरचनात्मक दृष्टिकोनातून पाहतात. ते म्हणतात, नोकरशाही म्हणजे असे संघटन ज्यामध्ये व्यवस्थित नियमांवर आधारित विशेषीकृत पदांचे एकीकृत पदसोपान असते. ही एक अशी अवैयक्तिक संरचना आहे ज्यामध्ये कायदेशीर सत्ता ही पदांना असते, त्या पदांवर बसणाऱ्या व्यक्तींना नाही.

बाटा के. डे. नोकरशाहीला तीन प्रकारे पाहतात. संरचनात्मक दृष्टीने नोकरशाही मूल्य तटस्थ आहे. ना ती नायक आहे ना खलनायक. मोठया व गुंतागुंतीच्या संघटनांमध्ये असणारी ती एक सामान्य बाब आहे. व्यावहारिक दृष्टिकोनातून नोकरशाहीचे कार्यात्मक चित्र समोर येते तर ध्येयप्राप्तीच्या दृष्टिकोनातून ते एक असे संघटन आहे ज्यामध्ये प्रशासकीय कार्यक्षमता वृद्धींगत होते.

थोडक्यात, नोकरशाही हा शब्द बहुआयामी व अनेकार्थी आहे. इतःपर आधुनिक शासनात ती अपरिहार्यतः असते. हे एक असे प्रशासकीय संघटन अथवा लोकसेवकांचे सरकार आहे ज्याचा

उद्देश स्वहित साध्य करणे आहे व यात व्यावसायिक स्वरुपात सेवा असते. उपरोक्त विश्लेषणातून असे म्हणता येते की नोकरशाहीमध्ये पदसोपान, व्यावसायिकता, सत्तेची कायदेशीरता, नियमाधिष्ठित कार्यपद्धती असतात. शिवाय या व्यवस्थेमध्ये अनेक दोष आहेत.

**नोकरशाहीचे प्रकार व भूमिका :**

नोकरशाहीचे अनेक प्रकार आहेत जे तिचे स्वरुप व भूमिका स्पष्ट करतात.

एफ. एम. मार्क्स नोकरशाहीचे चार प्रकार सांगतो.

**१) पालक नोकरशाही (Guardian Bureaucracy)**

यामध्ये पालकत्व स्वीकारलेली नोकरशाही ही जनहितासाठी कार्य करणारी असते. यातील नोकरशाही ही न्याय व लोककल्याणासाठी बांधील असते. परंतु ही नोकरशाही लोकमतापासून स्वतंत्र होती व जनतेप्रती अनुत्तरदायी होती. प्राचीन काळातील चीनी नोकरशाही, प्रशियातील लोकसेवा याचे उदाहरण आहेत

**2) जातीय नोकरशाही (Cast Bureaucracy)**

जातीय नोकरशाही म्हणजे अल्पजनशाही किंवा सरंजामशाही व्यवस्थांमध्ये एका ठराविक वर्गाच्या साधारणतः उच्चवर्गीय हितसंबंधांची विशेषत्वाने काळजी घेणारी नोकरशाही होय. अर्थातच, जनहित व सेवाभाव कमी असणारी ही नोकरशाही होती.

**3) आश्रित नोकरशाही (Patronage Bureaucracy)**

आश्रित किंवा संरक्षक नोकरशाहीमध्ये लोकसेवक व त्यांना या पदावर नियुक्ती देणाऱ्यांचे आर्थिक-राजकीय संबंध महत्वाचे असत. ही नोकरशाही पालक नोकरशाहीसोबत साधर्म्य बाळगून होती मात्र यामध्ये सेवाशाश्वती किंवा स्थायित्व नव्हते. उदा. अमेरिकेतील मलिदा पद्धत किंवा

लुट पद्धती होय ज्यामध्ये पक्षीय हितसंबंध डोळ्यासमोर ठेवून लोकसेवकांच्या नियुक्त्या केल्या जात मात्र पक्षाची राजकीय सत्ता बदलल्यानंतर लोकसेवकांचे स्थायित्व धोक्यात येत असे.

**4) गुणवत्ताधारित नोकरशाही (Merit Bureaucracy)**

गुणवत्ताधारित नोकरशाही ही दूजाभाव, वर्गहित, पक्षीय दृष्टिकोन यापासून मुक्त असते आणि यामध्ये खुल्या परीक्षेच्या माध्यमातून गुणवत्ताधारित लोकसेवकांना सेवेची संधी दिली जाते. आधुनिक लोकशाही व्यवस्थांमध्ये या माध्यमातून कार्यक्षम व जबाबदार नोकरशाही निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो.

**आधुनिक काळातील नोकरशाहीची विशेष भूमिका :**

उपरोक्त नमूद नोकरशाहीच्या चारही प्रकारात नोकरशाहीची भूमिका ही वेगवेगळी आहे. शासनव्यवस्थेचा प्रकार कोणता आहे, जनतेची सक्रियता कशी आहे यासारख्या बाबी देखील नोकरशाहीची भूमिका ठरवतांना अत्यंत महत्वाच्या ठरतात. नोकरशाही ही अपरिहार्य आणि शासनसंस्थेचा अविभाज्य घटक असल्याने त्याचे महत्वही मोठे आहे. शासनप्रकार कोणताही असला किंवा कालखंड कोणताही असला तरी नोकरशाहीची ठराविक कार्ये ही कायमच राहिलेली आहे त्यांची भूमिकाही थोड्याबहुत फरकाने तशीच राहिलेली आहे.

**१) ध्येयधोरणांची शिफारस करणे, सहायता करणे:**

नोकरशाहीची ही सर्वकालिक सर्वांत महत्वाची भूमिका आहे. ध्येयधोरणांची निर्मिती करणे, कायदे करणे हे जरी कायदेमंडळाचे कार्य असले तरी या विशेषज्ञतायुक्त, गुंतागुंतीच्या व तांत्रिक कार्याची पूर्तता ही नोकरशाहीच्या सहकार्याशिवाय होवू शकत नाही. कायदेमंडळातील सदस्य हे अननुभवी व विषयज्ञान नसणारे असू शकतात. अशावेळी नोकरशाहीचाच सल्ला उपयुक्त ठरतो. कोणत्या समस्येवर काय उपाययोजना होवू शकते? सार्वजनिक धोरणाचे स्वरूप कसे असावे ? या व अशा सर्व बाबींची शिफारस ही नोकरशाहीच करत असते.

**२) कायद्याचा मसूदा सुचविणे, त्याची अंमलबजावणी करणे:**

नोकरशाही ही स्थायी, अनुभवी, तंत्रकुशल असल्याने कायदेनिर्मितीसाठी ती कायदेमंडळाला सूचना व माहितीचा पुरवठा करत असते. कायदेनिर्मितीसारख्या किचकट व गुंतागुंतीच्या प्रक्रिया या नोकरशाहीच्याच टेबलावर पूर्ण होतात. कायद्याचा किंवा ध्येयधोरणाचा मसुदा किंवा आराखडा तयार करून कायदेमंडळाला तो सुपूर्द करण्याचे कार्य नोकरशाही करते. कायदेमंडळात या ध्येयधोरणाला मान्यता मिळाल्यानंतर त्यांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्याचे कार्यही संख्येने अत्यंत मोठया असणाऱ्या नोकरशाहीलाच करावे लागते. निर्दोष व परिपूर्ण कायदेनिर्मितीची प्रक्रिया पार पाडल्यानंतर तितकीच महत्वाची प्रक्रिया त्यांच्या सुव्यवस्थित अंमलबजावणीची असते. अत्यंत तृणमूल स्तरापासून ते उच्चपदस्थ नोकरशाहीची ही अत्यंत महत्वाची जबाबदारी आहे. किंबहुना योजना अथवा कायद्याचे यशापयश हे नोकरशाहीच्या सहकार्यावरच अवलंबून असते. कायदेनिर्मिती, अंमलबजावणी ते त्याच्या मूल्यमापनाच्या प्रत्येक पायरीवर नोकरशाही ही कायदेमंडळाला प्रभावित करत असते.

**३) सामाजिक परिवर्तन व न्याय:**

नोकरशाहीची ओळख तिच्या तांत्रिकता व कायदेशीरपणामुळेही होत असते. मात्र आजघडीला नोकरशाहीची ही रुक्ष ओळख पुसण्याचे प्रयत्न होत आहेत. सामाजिक न्याय व परिवर्तनासाठी नोकरशाहीने प्रतिबद्ध असावे आणि त्यासाठी त्यांनी आपले कौशल्य अनुभव पणाला लावावा अशी अपेक्षा आज त्यांच्याकडून केली जाते. वैविध्यपूर्ण समाजातील निरनिराळ्या मागण्या व अपेक्षांची पूर्तता करीत असतांना नोकरशाहीचीच भूमिका सर्वाधिक महत्वपूर्ण ठरते. शासन आणि जनता यांच्यामध्ये विश्वासू मध्यस्ताची भूमिका आज नोकरशाहीला पार पाडावी लागत आहे. दुर्बल, वंचित घटकांना लाभ मिळवून देणे तसेच गरजू, गरीबांपर्यंत शासकीय मदत पोचवणे ही आजच्या नोकरशाहीची प्रमुख कार्ये आहेत. कल्याणकारी राज्यात तर नोकरशाहीची हीच भूमिका सर्वाधिक महत्वपूर्ण आहे.

**४) आर्थिक विकास:**

आजघडीला संपूर्ण देशाच्या आर्थिक विकासाला गती देण्याचे मुख्य कार्य नोकरशाहीला करावे लागते. अर्थसंकल्पाची निर्मिती असो, आर्थिक विकासाच्या योजना असो, दारिद्र्य निर्मुलन व रोजगार निर्मितीच्या योजना असो नोकरशाहीची भूमिका अतिशय महत्वाची ठरते. औद्योगिकीकरण होत असलेल्या देशात मुख्य नियामक म्हणून नोकरशाहीलाच पुढाकार घ्यावा लागतो. याशिवाय देशामध्ये परकीय गंगाजळी आणण्यासाठी आपल्या कार्यात लवचिकता आणणे देखील नोकरशाहीच्या आजच्या प्राधान्यक्रमात आहे.

**५) लोकशाहीचे संवर्धन:**

जनतेप्रतीचे अनुत्तरदायित्व, शक्तीप्रियता, स्वहितकेंद्रीतता यामुळे आधुनिक लोकशाही व्यवस्थेच्या नोकरशाही विरोधात असल्याचा विचार मांडण्यात येत असे. मात्र मॅक्स वेबर व इतर विचारकांनी लोकशाही शासनव्यवस्था व नोकरशाही परस्परांना पुरक व उपयुक्त असल्याचे सप्रमाण सिद्ध केले. आजघडीला कायदेमंडळांना तथ्य-माहिती तसेच आकडेवारीचा पुरवठा करणे, निवडणूकांचे संचालन करणे, शासन बदलले तरी ध्येयधोरणांत सातत्य ठेवणे, शासन-जनता यांच्यामध्ये दुवा प्रस्थापित करणे या व अशा अनेक कारणांमुळे लोकशाही मूल्यांची जपणूक नोकरशाहीकडून होते. संविधानाप्रती जबाबदार राहून संविधानात नमूद आदर्श-मूल्यांची अंमलबजावणी करण्याच्या माध्यमातून नोकरशाही ही लोकशाहीचेच जतन करीत असते.

**जागतिकीकरणाच्या काळात नोकरशाहीची भूमिका:**

साधारणतः 1980 नंतर संपूर्ण जगात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने वेग घेतला. कल्याणकारी राज्यात शासनाची वाढलेली कार्यक्षेत्रे जागतिकीकरणात आकुंचन पावली. यात शासनाकडे पर्यायाने नोकरशाहीकडे पर्यवेक्षकांचे कार्य आले. नोकरशाही जी सुरवातीला कर्त्याच्या भूमिकेत होती आणि शासनाच्या सर्वच कार्याच्या पूर्ततेसाठी जबाबदार होती. ती आता नियंत्रकाच्या व मार्गदर्शकाच्या रुपात समोर येवू लागली. या नवीन व्यवस्थेमध्ये खाजगी क्षेत्र

आणि स्वयंसेवी संस्था किंवा नागरी समाजासारखी अशासकीय क्षेत्रे प्रभावी होती तिथे नोकरशाहीची जबाबदारी नवीन स्वरुपात समोर आली या नवीन व्यवस्थेत नोकरशाही सुविधा पुरवणारी यंत्रणा, विकासात सहाय्य करणारे शासनाचे प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहे. लोकशाहीकरण (Democratization), विकेंद्रिकरण (Decentralization), अनोकरशाहीकरण (Debureaucratization), व नोकरशाहीचा आकार कमी करण्याच्या (Downsizing) आजच्या प्रवाहात नोकरशाही ही तितक्याच महत्वाच्या भूमिकेत दिसून येते.

**सारांश :**

नोकरशाही ही सार्वत्रिक व अपरिहार्य स्वरुपाची यंत्रणा असली तरी तिच्या संबंधाने असणाऱ्या अनुभव व मतांमध्ये एकवाक्यता नाही. प्राचीन काळापासून तिचे अस्तित्व आहे शिवाय तिचे प्रकार भिन्न भिन्न राहत गेलेले असले तरी तिची भूमिका नेहमीच सार्वजनिक जीवनात मध्यवर्ती राहिलेली आहे. पोलिसी राज्य असो, कल्याणकारी राज्य असो वा आजच्या जागतिकीकरणाच्या काळातील मुख्य पुरवठादार म्हणून कार्यरत राज्य असो नोकरशाही व तिची भूमिका व कामगिरी सातत्याने चर्चेचा व चिंतनाचा विषय राहिली आहे.

**संदर्भ :**

१) शर्मा एम.पी. आणि सदाना बी.एल., पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन इन थिअरी ॲंड प्रॅक्टिस, न्यू दिल्ली,२००७, किताब महल पब्लिशर्स

२) भट्टाचार्य मोहित, न्यू हरॉइझन्स ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन, न्यू दिल्ली, २००७, जवाहर पब्लिशर्स ॲंड डिस्ट्रीब्यूटर्स

३) शर्मा प्रभुदत्त आणि शर्मा हरिश्चंद्र, लोकप्रशासन : सिद्धांत एवं व्यवहार, जयपुर,१९६६, कॉलेज बुक डेपोट

४) अगरवाल यु. सी.(संपा), 'पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन : व्हिजन अँड रिअलिटी', न्यू दिल्ली, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ॲडमिनीस्ट्रेशन

५) ॲडलर पॉल व बॉर्यस ब्रायन, 'टू टाईप्स ऑफ ब्युरोक्रसी: एनेबलिंग अँड कोअर्सिव्ह', ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सायन्स क्वार्टरली, व्हॉल्युम ४१, नं. १, मार्च १९९६

६) फराजमंद अली (संपा.), ब्युरोक्रसी अँड ॲडमिनीस्ट्रेशन, बोकारेटॉन,२००९, सीआरसी ( टेलर अँड फ्रान्सिस ग्रुप)

७) नरवणे द. ना., अधिकारी तंत्र, मराठी विश्वकोश, महाराष्ट्र शासन